प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

मे 26, 2014

**आरबीआयचा तिच्या खोट्या वेबसाईटबाबत सावधानतेचा इशारा**

आज रिझर्व बँकेच्या नजरेस आले आहे की, काही अज्ञात व्यक्तींद्वारे, निरनिराळ्या बँकिंग सेवा देऊ करणारी व "आरबीआय बचत खाते" उघडण्यास ऑनलाईन अर्ज करण्यास जनतेला सांगणारी एक खोटी वेबसाईट http://www.rbi-inonline.org/savings.html येथे निर्माण करण्यात आली आहे.

रिझर्व बँक येथे स्पष्ट करत आहे की, भारताची एक केंद्रीय बँक म्हणून, भारतीय रिझर्व बँक, बचत बँक खाते, चालु खाते किंवा क्रेडिट कार्ड्स ह्यासारख्या, वाणिज्य बँका देऊ करत असलेल्या सेवा देऊ करत नाही. त्यामुळे, ह्या खोट्या वेबसाईटवर निर्देशित केलेल्या ऑन लाईन सेवा, रिझर्व बँकेद्वारे दिल्या जाण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. रिझर्व बँकेने जनतेला सावधानतेचा इशारा दिला आहे की, जनतेने, ह्या खोट्या वेबसाईट देऊ केलेल्या खोट्या ऑफर्सना बळी पडू नये. ह्याशिवाय रिझर्व बँकेने जनतेला सावधानतेचा इशारा दिला आहे की, त्या वेबसाईटवर ऑन लाईन अर्ज केल्यामुळे, स्वतःची वैय्यक्तिक महत्वाची माहिती दिली जाऊन त्याचा गैरवापर केला जाऊन, जनतेचे आर्थिक व इतर प्रकारचे नुकसानच होऊ शकते.

जनतेने रिझर्व बँकेच्या अधिकृत वेबसाईटला rbi.org.in भेट द्यावी, आणि रिझर्व बँकेच्या किंवा तिच्या गव्हर्नरांच्या आणि वरिष्ठ अधिका-यांच्या नावे पाठविलेल्या प्रचंड पैशाच्या निरनिराळ्या खोट्या ऑफर्स बाबत अधिक माहिती मिळविण्यासाठी व अशा बाबतीत काय करावे ह्यासाठी, आधी दिलेली वृत्तपत्र निवेदने पहावीत व ती मिळविण्या/पाहण्यासाठी, हेडलाईन्स स्क्रोल कराव्यात.

**अल्पना किल्लावाला**

प्रधान मुख्य महाव्यवस्थापक

वृत्तपत्रांसाठी निवेदन : 2014-2015/2290.

| संबंधित वृत्तपत्र निवेदने व अधिसूचना | |
|---|---|
| **ऑक्टोबर 15, 2012** | आरबीआय, तिच्या नावे पाठविलेल्या फिशिंग मेलला प्रतिसाद न देण्याबाबत, आरबीआयचा जनतेला सावधानतेचा इशारा |
| **सप्टेंबर 14 2012** | तुमच्या इंटरनेट बँकिंग खात्याचा तपशील मागणा-या मेल्सना प्रतिसाद देऊ नका.  आरबीआयचा जनतेला सावधानतेचा इशारा |
| **मे 21, 2012** | फिशिंग मेलबाबत आरबीआयचा सावधानतेचा इशारा |
| **फेब्रुवारी 06, 2012** | खोट्या ऑफर्सबाबत आरबीआयचा जनतेला पुनश्च सावधानतेचा इशारा |
| **एप्रिल  05, 2011** | तुमच्या बँक खात्याचा तपशील आरबीआय कधीही मागत नाही |
| **फेब्रुवारी 15, 2011** | विदेशातून खूप मोठा पैसा मिळविण्यासाठी पैसे देऊ नका - आरबीआयचा इशारा. |
| **मे 28, 2010** | निधी हस्तांतरणाच्या खोट्या ऑफर्सना बळी पडू नका - आरबीआयचा इशारा |
| **मे 26, 2010** | लॉटरी, पैसा फिरविण्याच्या योजना, इतर स्वस्त निधींच्या खोट्या योजना इत्यादींसाठी निधी प्रेषण. |
| **जुलै 30, 2009** | खोट्या ऑफर्स/लॉटरीची बक्षिसे/स्वस्त निधीच्या योजनांच्या ऑफर्स ह्यापासून सावध रहा - आरबीआय |
| **डिसेंबर 07, 2007** | विदेशातून स्वस्त निधीचे प्रेषण करण्याच्या खोट्या ऑफर्सबाबत आरबीआयचा जनतेला सावधानतेचा इशारा |